परवानगी वर्ष :-२०१३-२०१४
माध्यम :- इंग्रजी
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा** (यादी क्र.७६२)
(माध्यमिक)

जा.क्र.शिउसं/माध्य-३/१३/प्र.मा./पुवि/२०१३ ३३/१०१७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :- 2 1 DEC 2013

(3)

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे.

**विषय :- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत.**
**गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल जेजूरी ता.पुरंदर जि.पुणे**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्रं.स्वंयअ-२०१३/(८५/१३)माशि-१ दिनांक १५ जून २०१३
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं माध्य-३/१२/स्वंयअशाळा/मान्यता/पुवि/१३/२१४१०/१३ दिनांक २८-८-२०१३
३)आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र. जि प/माध्य/स्वंयअर्थ/३४७२/ दिनांक २३.१०.२०१३
४) दिनांक ७.११.२०१३ च्या पाचगणी येथील आढावा बैठक

वरील संदर्भोय पत्रान्वये कळविण्यात येते की,माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये या जन समर्थ संस्था ता.पुरंदर जि.पुणे संस्थेच्या **गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल जेजूरी, ता.पुरंदर जि.पुणे** या माध्यमिक शाळेच्या **इयत्ता ९ वी १० वी (इ.नववी दहावीच्या प्रथम वर्गास)** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षासाठी जुन २०१३ पासून एक वर्षासाठी आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता प्रथम मान्यता देण्यात येत आहे..

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२ नविन वर्गाना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे

४. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश, सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

१५. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२ अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून असेल

१३ शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २०० व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नविन शाळा** /वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

A:\\of Documents and Settings\all Desktop\Shaikh ...

Principal / प्राचार्य
Gurukul English Medium School
गुरुकुल इंग्लिश मेडीयम स्कुल
Jejuri, Tal. Purandhar, Dist. Pune (MH)

Principal / प्राचार्य
Gurukul English Medium School
गुरुकुल इंग्लिश मेडीयम स्कुल
Jejuri, Tal. Purandhar, Dist. Pune (MH)

१८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापनाव विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वयं अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :-**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतींची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.३४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९.

२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४११६/याचिका/१५ क(८)९३४४

दिनांक २४ सप्टेंबर-२००९.

६. **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळास इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा

स्थळ प्रतिवर मा.शि.उ.सं यांची स्वाक्षरी असे

(धनाजी बुटे )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.करीता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१. मुख्याध्यापक, गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल जेजूरी ता.पुरंदर जि.पुणे

२. विभागीय सचिव, पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, जन समर्थ संस्था जेजूरी ता.पुरंदर जि.पुणे

माहितीसाठी सादर,

१.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

२.निवडनस्ती.

Principal / प्राचार्य
Gurukul English Medium School
गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल
Jejuri, Tal. Purandhar, Dist. Pune (MH)
Jejuri, Tal. Purandhar, Dist. Pune (MH)